**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती सुलभा सुरेश बखले
प्लॉट नं.१, नारायणी अपार्टमेंट, शिवस्वरूपनगर,
पाचगाव रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक अभियंता (श्रेणी-१),
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, कराड, कराड कोयना सायडिंग

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४. ६ .२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती सुलभा सुरेश बखले
प्लॉट नं.१, नारायणी अपार्टमेंट, शिवस्वरूपनगर, पाचगाव रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, कोल्हापूर श्री.रा.कृ.अडसुळे

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक अभियंता (श्रेणी-१),
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, कराड, कराड कोयना सायडिंग श्री.रा.य.रेड्डीयार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.९.३००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.१२.२००८ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.६.२००९ रोजी घेण्यात आली.

लघुपाटबंधारे विभाग, कराडमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (श्रेणी-१), लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग कराड, कराड कोयना सायडिंग यांनी अपुरी दिली. एका कर्मचाऱ्याची माहिती जाणीवपूर्वक दिली नाही. प्रथम अपिलानंतर ऊर्वरित माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सातारा यांनी अपिलाची सुनावणी न घेता निर्णय दिला. एकूण ५४ दिवस विलंबाने आपल्याला माहिती मिळाल्यामुळे व जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (श्रेणी-१), लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग कराड, कराड कोयना सायडींग व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, सातारा यांनी संगनमताने सत्य लपविले असल्यामुळे त्यांना शास्ती करून ती रक्कम आपल्याला मिळावी, अशी मागणी अपीलकर्त्या श्रीमती सुलभा सुरेश बखले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात केली आहे, त्याचाच पुनरूच्चार त्यांनी सुनावणीत केला.

श्रीमती बखले यांचा अर्ज दि.८.१०.२००८ रोजी प्राप्त झाला. दि.१०.११.२००८ रोजी त्यांनी शुल्क भरल्यानंतर दि.११.११.२००८ रोजी त्यांना माहिती दिली. नवीन बदलून आलेला एक कर्मचारी माहिती मागणीच्या अर्जातील कालावधीत अन्य विभागात कार्यरत होता. ती माहिती त्या विभागाकडून मागवून दिली. श्रीमती बखले एकाच कर्मचाऱ्याच्या अनुषंगाने सातत्याने विविध अर्जांद्वारे माहिती मागत आल्या आहेत व त्या त्या वेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. काही

बाबींचे विश्लेषण, तसेच काल्पनिक मुद्दयांच्या अनुषंगाने भाष्य याची मागणी त्यांनी केली असून ती देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (श्रेणी-१), लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग कराड, कराड कोयना सायडिंग श्री.रा.य.रेड्डीयार यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली असल्यामुळे कागदपत्रे पाहता सुनावणीची आवश्यकता वाटली नाही. त्यामुळे सुनावणी न घेता अपिलाचा निर्णय दिला, असे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग सातारा श्री.रा.कृ.अडसुळे यांनी प्रतिपादन केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी श्री.रा.य.रेड्डीयार यांनी अन्य विभागातून माहिती मागवून दिली आहे, त्यामुळे विलंबाबाबतचा अपीलकर्त्यांचा आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता सुनावणीची आवश्यकता अपिलीय प्राधिकाऱ्यांना वाटली नाही व कागदपत्रांनुसार त्यांनी निर्णय घेतला, हे आक्षेपार्ह नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. पूर्वसूचनेशिवाय रजेवर गेलेल्या कर्मचाऱ्यांचे स्पष्टीकरण यासारखे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. तसेच जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावून ती अपीलकर्त्यांना देण्याची कायद्यात तरतूद नाही, याची समज अपीलकर्त्या श्रीमती सुलभा सुरेश बखले यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे-४११ ००१

श्री. शब्बीर महमद हनिफ मुल्ला
४०७, रविवार पेठ, कराड, जि. सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कराड
ता. कराड, जि. सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कराड
ता. कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |
| ३ | **उपस्थित -** श्री. शब्बीर महमद हनिफ मुल्ला, ४०७, रविवार पेठ, कराड, जि. सातारा<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कराड, ता. कराड, जि. सातारा श्री. विठ्ठल जोशी<br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कराड, ता. कराड, जि. सातारा श्री. विवेक जाधव | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.७.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.७.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.९.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.११.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. ५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कराड येथील एका मिळकतीच्या बाबतीत नकाशानुसार ती अस्तित्वात असल्याचे दिसते, परंतु त्याबाबतचे सन २००७ नंतरचे ७/१२ उतारे दिले जात नाहीत. 'सदर मिळकत नगररचना योजनेत गेल्यामुळे ७/१२ उतारा देता येत नाही,' असे उत्तर आपल्याला दिले गेले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी ७/१२ देण्यात आला, त्याबद्दल आपले समाधान झाले आहे. परंतु महाराष्ट्र वक्फ मंडळाच्या पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. शब्बीर महमद हनिफ मुल्ला यांनी केले.

कराड नगररचना योजना लागू झाल्यामुळे सन २००१ नंतरचा ७/१२ उतारा देता येत नसल्याचे विहित मुदतीत श्री. मुल्ला यांना कळविले. अन्य उताऱ्याच्या प्रती त्यांना दिल्या. वक्फ मंडळाने दि. ९.५.२००८ रोजी दिलेल्या आदेशानुसार नोंद का केली नाही, असे श्री. मुल्ला यांनी मूळ अर्जात विचारले होते, त्याचे उत्तर दिले होते. मात्र वक्फ मंडळाच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती हवी असल्याचे त्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी स्पष्ट केले. त्यानुसार माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कराड श्री. विठ्ठल जोशी यांनी नमूद केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी कमी जास्त पत्रक (क.जा.प.) करुन वेगळा ७/१२ करुन दिला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कराड यांनी सांगितले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व उभय बाजूंची निवेदने विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कराड व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीदार, कराड यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सतीश बंडोपंत बापट
पोस्ट ऑफिसजवळ, मु.पो.आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, मंडल कार्यालय, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, मंडल कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६०+८३९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, मंडल कार्यालय, सांगली प्रतिनिधी श्री.प्र.ज.जेधे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, मंडल कार्यालय, सांगली श्री.प्र.ज.जेधे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.१२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

वीज कनेक्शन बंद करणे, नंतर चालू करणे व पुन्हा बंद करणे याबाबत आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, मंडल कार्यालय, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, मंडल कार्यालय, सांगली यांनी दडवून ठेऊन दिशाभूल व फसवणूक केली. दिलेली माहिती खोटी दिली, असे सविस्तर प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सतीश बंडोपंत बापट यांनी लेखी निवेदनाद्वारे केले आहे. श्री.शंकर सिताराम बापट यांच्या नावाचे जमिनीवरील विहिरीवर वीज कनेक्शन होते. त्यांच्याकडून आपल्याला जमिनीचा कब्जा मिळाला. सर्व कागदपत्रांची पूर्तता करुनही वीज मंडळाने ते कनेक्शन आपल्या नावे केले नाही व पूर्वसूचना न देताच बंद केले. दुसऱ्या कनेक्शनची मागणी केल्यावर आपल्या नावे ते जोडण्यात आले, परंतु पाचच दिवसात ते पुन्हा नियमबाह्य रितीने तोडण्यात आले. याबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी खोटी व विसंगत दिली, म्हणून आपण अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, मंडल कार्यालय, सांगली यांच्याकडे अपील केले. काही मुद्दयांवर दिलेल्या माहितीच्या फेरतपासणीसह पुन्हा संपूर्ण माहिती दहा दिवसांत देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, मंडल कार्यालय, सांगली यांनी दिले. त्यावरही अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी माहिती देऊन काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दडवून ठेवली, असे डॉ.बापट यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

डॉ.बापट यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत त्यांना देण्यात आली. काही मुद्दयांमध्ये त्यांनी भाष्य व खुलाशाची मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशा स्वरुपाची विचारणा करता येत नाही, याची कल्पना त्यांना लेखी स्वरुपात देण्यात आली आहे. ते व त्यांचे चुलते / चुलतभाऊ यांच्यामध्ये जमिनीच्या मालकी हक्काबाबतचा वाद न्यायालयात आहे. या वादाच्या निर्णयाआधीच जमिनीची मालकी आपली असल्याचे मान्य करुन वीज कनेक्शनबाबत कार्यवाही करावी अशी त्यांची मागणी आहे. ती मान्य करणे शक्य नाही, असे त्यांना कागदपत्रांसह स्पष्ट करण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी [illegible] व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.प्र.ज.जेधे यांनी लेखी व तोंडी केले. उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

अपीलकर्ता

श्री. सुधाकर शंकर होनराव
८८०, शिवतेज, स.नं.१०/११, सुखसागर नगर,
कात्रज, पुणे-४११ ०४६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक,
(उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.१२.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुधाकर शंकर होनराव
८८०, शिवतेज, स.नं.१०/११, सुखसागर नगर,
कात्रज, पुणे-४११ ०४६

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ श्री. लक्ष्मण दत्तात्रय कोकाटे

४. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

सन २००६ मध्ये अधिव्याख्यात्यांना वरिष्ठ व निवडश्रेणीत शासनाने स्थान दिले. त्यात पात्र असूनही बऱ्याच अधिव्याख्यात्यांचा समावेश केला गेला नाही, याला जबाबदार कोण, व त्या अनुषंगाने काय कार्यवाही केली, याची माहिती आपल्याला मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सुधाकर शंकर होनराव यांनी केले.

श्री. होनराव यांनी मागितलेली माहिती वेळोवेळी देण्यात आली आहे. या संदर्भात किमान बारा वेळा त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला. शासन निर्णयामध्ये काही त्रुटी राहून गेल्याचे निदर्शनास आल्याने अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ श्रेणी / निवडश्रेणीमध्ये स्थान निश्चितीमध्ये बदल केलेला आहे व सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, त्यात अपीलकर्त्याच्या प्रस्तावाबाबतचा समावेश आहे, असे लेखी निवेदन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे डॉ.का.म.कुळकर्णी व विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण संचालक, डॉ. रा.वि. किर्दक यांनी केले. त्यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी श्री. लक्ष्मण दत्तात्रय कोकाटे यांनी सुनावणीत त्याचाच पुनरुच्चार केला. श्री. होनराव सातत्याने तोच विषय मांडत असल्याचे श्री. कोकाटे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. या बाबी लक्षात घेता अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात आल्या आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०९ .१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मीकांत गोपीनाथ लोंढे
मु.पो.स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, दौंड,
ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६३ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लक्ष्मीकांत गोपीनाथ लोंढे
मु.पो.स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे बाळासाहेब वानखेडे
**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, दौंड,
ता.दौंड, जि.पुणे श्री.का.ज.मदने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.११.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

नगर भूमापन क्र.९८, मौजे स्वामी चिंचोली या जागेस नाव दाखल होऊन सन, टोच नकाशा, निर्णयाची नक्कल, आखीव पत्रिका मिळण्याबाबत.

## विवेचन

मौजे स्वामी चिंचोली, तालुका दौंड येथील मिळकतीला महाराष्ट्र शासनाच्या नावाच्या जागी आपले नाव दाखल करुन त्यानुसार नकाशा व अन्य कागदपत्रे मिळावीत, अशी अपीलकर्ता श्री.लक्ष्मीकांत गोपीनाथ लोंढे यांची मागणी आहे. ग्रामपंचायतीने १९८७ साली आपल्याला दिलेल्या बखळ जागेवर आपले नाव लावले जात नाही व त्यानुसार कागदपत्रे दिली जात नाहीत, अशी तक्रार श्री.लोंढे यांनी केली. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या अंतर्गत अर्धन्यायिक स्वरुपाची अशी ही बाब आहे. श्री.लोंढे संबंधित मिळकतीला आपले नाव लावावे, अशी मागणी वारंवार विविध अर्जांद्वारे व तक्रारीद्वारे करीत असतात. याबाबत मालकी हक्काचे पुरावे सादर करण्यास श्री.लोंढे यांना सांगण्यात आले होते व त्वरित निर्णय देण्याचा आदेश जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख याना देण्यात आला होता. संबंधित जागा महाराष्ट्र शासनाच्या मालकीची असल्याची सन १९८४ सालातील नोंद आहे. त्यामुळे श्री.लोंढे यांची मागणी मान्य करता येत नाही. जागा शासकीय असल्याने जिल्हाधिकाऱ्यांकडून त्यांनी जागेची मागणी करावी, असा अहवाल तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी दिला असल्याचे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.का.ज.मदने व अपिलीय प्राधिकारी श्री.बा.वा.वानखेडे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

सचीव,
नरवाड विविध कार्यकारी सहकारी संस्था, मर्या.
नरवाड, ता.मिरज, जिल्हा सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मिरज,
जिल्हा सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
सचीव, नरवाड विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.,
नरवाड, ता.मिरज, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७८ / २००९ /सांगली |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६/५/२००९ |
| ३ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३/६/२००९ |
| ४ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -<br>माहिती- अपीलाची (जोडपत्र-क) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता सचीव , नरवाड विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. नरवाड, ता.मिरज, जिल्हा सांगली यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज,

जिल्हा सांगली यांच्या दि. ३/६/२००९ रोजीच्या आदेशान्वये व्यथित होऊन आयोगाकडे अपील केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार अपील व्यक्तीच्या नावे करणे आवश्यक आहे, पदनामाने नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. रविंद्र उर्फ भोला जगताप
पंचशीलनगर, कसबा, बारामती, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),
नगरपालिका प्रशासन शाखा,
विभागीय आयुक्त कार्यालय,
विधानभवन, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९९+६००+६०१/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. रविंद्र उर्फ भोला जगताप
पंचशीलनगर, कसबा, बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),
नगरपालिका प्रशासन शाखा,
विभागीय आयुक्त कार्यालय,विधानभवन, पुणे-१

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.०६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.०७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.०८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०४.११.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>१) **अपील क्र.५९९-** बारामती नगरपारिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी उद्यान कसबा सर्व्हे नं.३९ मधील ग्रीन झोन न उठविता इमारतीचे बांधकाम केले या बांधकामाच्या टेक्निकल मंजुरी, निधीच्या अनुषंगाने माहिती<br>२) **अपील क्र.६००-** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने बारामती नगरपरिषद येथे बनविलेल्या रिंग रोडच्या अनुषंगाने माहिती<br>३) **अपील क्र.६०१** - पद्मश्री आप्पासाहेब मार्ग जागा हस्तांतर व स्ट्रीट लाईट व मुस्लीम जमात कब्रस्तानची जागा हस्तांतर व झालेला खर्च याबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.०६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२७.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

बारामती नगरपरिषदेतर्फे ग्रीन झोन न उठविता केलेले बांधकाम, निविदा न काढता केलेल्या रस्त्यावरील दिवाबत्तीचे काम, रिंग रोडमध्ये गेलेल्या जागा व विस्थापितांना दिलेला मोबदला या बाबतची योग्य माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे यांनी दिली नाही. एका अपिलात (अपील क्र.६००) माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी दिला. परंतु त्यानुसार माहिती दिली गेली नाही. बेकायदेशीरपणे कामे केली जात आहेत. ते उघड होऊ नये म्हणून माहिती दिली जात नाही, अशी अपीलकर्ता श्री. रविंद्र उर्फ भोला जगताप यांची तक्रार आहे. त्यानुषंगाने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

ग्रीन झोन उठविलेला नसताना सुमारे रुपये वीस लाखांचे बांधकाम करण्यात आले, पद्मश्री आप्पासाहेब पवार मार्ग नगरपालिकेकडे हस्तांतर केलेला नसताना कायद्याच्या नेमक्या कोणत्या कायदेशीर तरतुदीनुसार रस्त्यावरील दिवाबत्तीचे काम केले आहे हे सांगितले जात नाही. हस्तांतर झालेले नसल्यामुळे रस्ता तयार करत असताना बारामती नगरपारिषदेला गौण खनिजापोटी रुपये बेचाळीस हजार रॉयल्टी भरावी लागली. नियमांचे उल्लंघन करुन व १०-१५ वर्षांच्या विकास

आराखडयाचा विचार न करता अशी कामे केली जात आहेत, इ.मुद्दे श्री.जगताप यांनी सविस्तर लेखी निवेदनामध्ये नमूद केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्यांचा निर्णय करता येणार नाही. त्यासाठी अपीलकर्त्यास मर्जीतर उचित न्यायासनाकडे दाद मागण्याचा मार्ग उपलब्ध आहे.

श्री.जगताप यांच्या प्रत्येक मुद्यांवर माहिती दिलेली आहे. अपील क्र.६०० मध्ये काही मुद्दयांचा तपशील देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यासह सर्व माहिती श्री.जगताप यांना दिलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे श्री. किरणराज प्रतापराव यादव यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक : ६३ / १०/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**